

# माझी आई

शब्दांमध्ये मांडण्या इतके
सोपे तुझे अस्तित्व नाही
पुढील जन्म तुझ्याच पोटी
मज मिळावा आई.

काव्य अपुरे शब्द तोटके
तुझी थोरवी गाता
भाग्यवान मी म्हणून
मजला लाभली तु माता

संस्कारांची तुझी शिदोरी
देतो मी पुढच्या पिढी
ठेच लागता आजही मजला
रडते तुझी ममता वेडी

किती पाहिले ऋतु सोहळे
किती सोसले ऊन हिवाळे
कटू, गोड आठवणीतूनही
नितळ पाझरे तुझेच डोळे.

असोत सूचना वा हाकार
वाणीस तुझ्या होती धार
अजुनसुद्धा नजरेचा मला
धाक वाटतो फार

सद्गुरूंच्या बोधामुळे
तुज पुढील जन्म नाही
योग मला भेटेल मग
तुजवीना तेव्हा आई

काळालाही सांगेन थांब
करू नकोस घाई
मातेच्या ऋणातून मजला
होऊ दे उतराई.